# महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्रमांक :- बैठक-२०१२/प्र.क्र.३०२/इमा.३
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- ३.१०.२०१२

प्रति,

१. मा. सचिव (मदत व पुर्नवसन), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. श्री.एस.चोक्कलिंगम, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. सर्व मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.विभाग, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/नाशिक.
४. मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां.विभाग, मुंबई.

**विषय - दुय्यम निबंधक कार्यालयांच्या सुशोभिकरणासंदर्भात दि.१०.५.२०१२ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त**

उपरोक्त विषयाबाबत दि.१०.५.२०१२ रोजी मा.सचिव (बांधकामे) यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने बैठकीचे इतिवृत्त सोबत सादर करण्यात येत आहे.

( वि.स.रघोजीवार )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सहपत्र - इतिवृत्त

\\CH001020b\common\patil\Meeting\CR 302 registar.doc

## दिनांक १०/५/२०१२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे दुय्यम निबंधक कार्यालयांच्या सुशोभिकरणा संदर्भात झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

दि. १०/५/२०१२ रोजी मा. प्रधान सचिव (मदत व पुर्नवसन) यांचे समवेत मा. सचिव (बांधकाम) यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे नोंदणी व मुद्रांक विभागातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांच्या सुशोभिकरणासंदर्भात बैठक संपन्न झाली.

सदर बैठकील खालील अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री. एस. चोक्कलिंगम् | - नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| २) श्री. एन. एच. जळकोटे | - मुख्य अभियंता, पुणे |
| ३) श्री. एच. आर. पवार | - मुख्य अभियंता, नाशिक |
| ४) श्री. ई. पी. उगले | - मुख्य अभियंता, नागपूर |
| ५) श्री. पी. जी. गणवीर | - मुख्य अभियंता, अमरावती |
| ६) श्री. सी. पी. जोशी | - मुख्य अभियंता, औरंगाबाद |
| ७) श्री. प्रदीप डांगे | - उप सचिव (इमारती) |
| ८) श्री. राजेश नार्वेकर | - उप सचिव (मदत व पुर्नवसन), म-१ |
| ९) श्री. व्ही. एस. रघोजीवार | - अवर सचिव (इमारती) |

प्रथम माननीय अध्यक्षांनी सर्वांचे स्वागत करून बैठकीस सुरूवात केली. सदर बैठकीमध्ये खालील मुद्दे चर्चीले गेले.

अ) मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचे मुद्दे-

१) नोंदणी महानिरीक्षकांनी बैठकीमध्ये राज्यातील दुय्यम निबंधकांकरीता नव्याने मंजूर केलेल्या कार्यालयांची यादी उपलब्ध करून दिली. यामध्ये पुणे प्रादेशिक विभागामध्ये पुणे शहराकरिता खालील कार्यालये नव्याने मंजूर झाली आहेत.

१. हवेली क्र. २१
२. हवेली क्र. २२
३. हवेली क्र. २३
४. हवेली क्र. २४
५. हवेली क्र. २५
६. हवेली क्र. २६

१) नविन मंजूर कार्यालयांपैकी फक्त हवेली क्र. २१ या कार्यालयाच्या सुशोभिकरणाचे काम करावयाचे असून त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करून उपभोक्ता विभागास देण्यात आले आहे. उर्वरीत पाच कार्यालयांचे सुशोभकरण सध्या आवश्यक नसल्याचे नोंदणी महानिरीक्षक यांनी सांगितले.

३) इतर प्रादेशिक विभागांमध्ये नव्याने मंजूर झालेली कार्यालये व त्यापैकी ज्या कार्यालयांचे सुशोभिकरण करावयाचे त्यांची यादी नोंदणी महानिरीक्षकांनी बैठकीत सर्व मुख्य अभियंता यांना उपलब्ध करून दिली. त्यानुसार सर्व प्रादेशिक विभागांकडून आढावा अपेक्षित आहे.

४) या व्यतिरिक्त अस्तित्वातील ज्या कार्यालयांचे सुशोभकरणाची अंदाजपत्रके अद्याप प्राप्त झालेली नाहीत अशा एकुण ४० कामांची यादी बैठकीत सर्व मुख्य अभियंता यांना उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये काही कार्यालयांकरिता नविन इमारती प्रस्तावित असून ज्या कामांची अंदाजपत्रके संबधील विभागाकडे मंजूरीकरिता पाठविण्याल आली आहेत. मात्र नविन काम पुर्ण होईपर्यंत अस्तित्वातील कार्यालयांच्या सुशोभिकरणासाठी ज्या वस्तु (Moveable Items) एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी हलवू शकलो. अशा बाबींची आवश्यकता तपासून अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक आहे, जेणेकरून सदरच्या वस्तु (Moveable Items) नविन जागेत वापरता येतील. सदरचे अंदाजपत्रक संबंधीत जिल्हा निबंधक यांचे सहमतीने तयार करून अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे विभाग, पुणे यांचेमार्फत नोंदणी महानिरीक्षकांकडे मंजूरी करिता पाठवावयाचे आहे.

नविन इमारतीच्या प्रस्तावित अंदाजपत्रकामध्ये Moveable Items चा अंतर्भाव केला असल्यास त्या अंदाजपत्रकीय रकमेतून सुशोभिकरणासाठी प्रस्तावीत केलेल्या Moveable Items ची रक्कम कमी करावी. याविषयी सर्व प्रादेशीक विभागांनी कार्यवाही करावयाची आहे.

१) ज्या दुय्यम निबंधक कार्यालयांकरिता नविन इमारती प्रस्तावित आहेत, त्या करीता जागा निश्चित करण्यात आली असून त्यांची माहिती बैठकीत माहितीकरीता उपलब्ध करून

देण्यात आली, ही जागा मिळण्याची कार्यवाही उपभोक्ता विभागाकडून सुरू असून, ती मिळताच त्या ठिकाणी यापुर्वी पाठविलेल्या नकाशानुसार अंदाजपत्रक तयार करून मंजूरीकरिता पाठवावयाचे आहे.

ब) उक्त मुद्यांवरील चर्चेअंती मा. सचिव (बांधकामे) यांनी खालीलप्रमाणे सूचना दिल्या-

१) दुय्यम निबंधकांच्या कामाचे जिल्हावार सनियंत्रण करण्याकरीता प्रत्येक जिल्हा मुख्यालयी असलेल्या कार्यकारी अभियंता यांची नेमणुक करावी.

२) राज्य पातळीवरील सनियंत्रण यापुढे अधीक्षक, सा. बां. मंडळ, पुणे यांचे ऐवजी मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे हे पाहतील.

३) कामे त्वरीत व योग्य पध्दतीने पुर्ण करण्याकरिता एक कालबध्द कार्यक्रम आखावा व त्यानुसार १५ ऑगस्ट पर्यंत सर्व कामे पुर्ण करण्याचे नियोजन करावे.

४) कामे योग्य त-हेने ठरविलेल्या मानकानुसार पुर्ण होतील याकडे सर्व संबंधीतांनी लक्ष पुरविणे आवश्यक असून त्या दृष्टीने सर्व मुख्य अभियंता यांनी दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी सर्व अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता व जिल्हा निबंधकांसमवेत कामांच्या प्रगती तसेच अडीअडचणी बाबत बैठक घ्यावी, या कामांची पहिली बैठक दि. २ जून २०१२ रोजी होईल.

५) पुणे प्रादेशिक विभागाकडे कोथरूड येथील एका कार्यालयाचे काम ठरलेल्या मॉडेल नुसार पुर्ण करण्यात आले आहे. त्याचे Walk-through प्रझेंटेशन व चित्रफित सर्व प्रादेशिक कार्यालयांना उपलब्ध करून देण्यात यावी व त्यानुसारच काम होईल याची प्रादेशिक विभागांनी काळजी घ्यावी.

उपरोक्तप्रमाणे चर्चा होवून बैठकीची सांगता झाली.